PUDHARI, Mumbai, 28.11.2023
Page No. 3, Size:(11.30)cms X (6.34)cms.

**Bullet train project's BKC Station construction is under progress.**

# बुलेट ट्रेनच्या बीकेसी स्थानकाची उभारणी सुरू

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील वांद्रे-कुर्ला संकुलातील (बीकेसी) मैदानात बीकेसी स्थानकाच्या कामाला सुरुवात झाली आहे. रस्ते सपाटीपासून २४ मीटर खोल खोदकाम करून स्थानकाची उभारणी करण्यात येणार आहे.

प्लॅटफॉर्म, कॉन्कोर्स आणि सर्व्हिस फ्लोअर असे तीन मजले असतील. एकूण ४.८ हेक्टर जमिनीवर हे स्थानक उभारण्यात येणार आहे. बुलेट ट्रेनच्या मार्गातील बीकेसी हे एकमेव भूमिगत स्थानक आहे.

नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने (एनए-चआरसीएल) वांद्रे-कुर्ला संकुलातील ४.८५ हेक्टर जमीन बांधकामासाठी कंत्राटदाराकडे सुपूर्द केली आहे.

सध्या ५५९ मजूर आणि पर्यवेक्षक रात्रंदिवस काम करत आहेत. प्रकल्पातील पुढील टप्प्यात रोज सहा हजार कामगारांची गरज लागणार आहे. याशिवाय धूळ कमी करण्यासाठी मिस्ट गनचा वापर करण्यात येत आहे.

- **३,६८०.९७ कोटी खर्च**
- **कालमर्यादा-काम सुरू झाल्यानंतर ५४ महिन्यांच्या आत**
- **या पॅकेजमध्ये ४६७ मीटरच्या कट आणि कव्हरची लांबी आणि ६६ मीटरच्या व्हेंटिलेशन शाफ्टचादेखील समावेश आहे. हा शाफ्ट-टनेल बोरिंग मशीन (रिट्रीव्हल शाफ्ट) बाहेर काढण्यासाठी देखील वापरला जाईल.**
- **स्टेशनमध्ये सहा प्लॅटफॉर्म असतील प्रत्येक प्लॅटफॉर्मची लांबी अंदाजे ४१५ मीटर आहे. १६ डब्यांची बुलेट ट्रेन उभी राहणार. स्टेशनला मेट्रो आणि रस्त्याची जोडणी .**
- **बीकेसी स्टेशन बांधण्यासाठी सुमारे ४.८ हेक्टर जमीन आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, बांधकाम प्रक्रिया सुलभ करण्यासाठी कंत्राटदाराने - मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून अंदाजे ३.२ हेक्टर जमिनीची मागणी केली आहे.**

